Peer Reviewed International Research Journal of Geography
Maharashtra Bhugolshastra Sanshodhan Patrika
ISSN : 0971-6785 {Impact Factor 2.561 (IIFS)} Vol. 33, No.1, Jan-Jun. 2016. pp 84 - 90

# SEX RATIO ANALYSIS : A CASE STUDY OF DAUNDTAHSIL OF PUNE DISTRICT, MS

R.Jadhav, A. Rahate,

**Abstract:**

*Sex ratio is a significant demographic and cultural index. The proportion of females to males is an important issue for the development of the society. It reflects the socio-economic conditions prevailing in an area and is a useful tool for geographic analysis of an area. According to the observation of United Nation Population Division, all over the world, the male population is more than female population. The same trend is noticed in DaundTahsil of Pune District. As per census 2011, Daundtahsil ranked 8th in sex ratio and 12th in child sex ratio in Pune District. In the present paper an attempt has been made to analyze circle-wise sex ratio, child sex ratio, SC and ST sex ratio, rural and urban sex ratioof Daundtahsil for the period 1991 to 2011. For the detail analysis of sex ratio five circles of Daundtahsil have been studied by applying the 1991, 2001 and 2011 census data from Town and Village Directory of Pune District. Various cartographic techniques werewerewere used to depict the sex ratio. ArcGIS software was employed to prepare the base map and thematic maps of the study area.*

*The positive change in sex ratio was recorded only in Daund circle and the remaining circles showed the negative trend in sex ratio during the period 1991 to 2001, whereas the positive change was observed in Daund and Ravangaon circleduring the period 2001 to 2011. In case of child sex ratio, the positive growth was observed only in Ravangaon circle. Highest SC sex ratio was observed in Rahu, Yavat and Kedgaon circle and highest ST sex ratio was observed in Kedgaon, Kedgaon and Daund Circle respectively in 1991, 2001 and 2011.*

**प्रस्तावना :** निकोप सामाजिक जीवनाच्या दृष्टीने लोकसंख्येमध्ये स्त्री–पुरूषांचे प्रमाण समान असावे असे मानले जाते. पुरुष व स्त्रियांची संख्या कधीही सारखी आढळत नाही. जागतिक लोकसंख्येतही पुरूषांची लोकसंख्या स्त्रियांच्या लोकसंख्येपेक्षा जास्त आहे. भारत, महाराष्ट्र, पुणे हे देखील यास अपवाद नाहीत. म्हणून आदर्श सामाजिक व लोकसंख्याशास्त्रीय वैशिष्ट्यांच्या अभ्यासामध्ये दर हजारी स्त्रियांची लोकसंख्या विचारात घेतली जाते.

सदर शोधनिबंधात पुणे जिल्हयातील दौंड तालुक्यातील लिंग गुणोत्तराचे विश्लेषण केले आहे. सन २०११ जणगणनानुसार पुणे जिल्हयाचे लिंग गुणोत्तर ९१५ इतके असून दौंड तालुक्याचे लिंग गुणोत्तर ९३० इतके आहे. पुणे जिल्हयात लिंग गुणोत्तरामध्ये दौंड तालुक्याचा ८ वा क्रमांक लागतो. तर बाल लिंग गुणोत्तारामध्ये दौंड तालुक्याचा १२ वा क्रमांक लागतो. याच वर्षी पुणे जिल्हयाची साक्षरता ७६.०६% इतकी असून दौंड तालुक्याची साक्षरता मात्र ६९.३८% इतकी होती. म्हणूनच दौंड तालुक्यातील लिंग–गुणोत्तर विश्लेषण करताना एकूण लिंग गुणोत्तर, बाल लिंग गुणोत्तर, अनुसूचित जाती व जमातींमधील लिंग गुणोत्तर अभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे.

**उद्दिष्टये :**


दौंड तालुक्यातील सन १९९१ ते २०११ या दोन शतकातील मंडलनिहाय एकूण लिंगगुणोत्तर –बाल लिंगगुणोततर,अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील लिंग गुणोत्तर, ग्रामीण व नागरी भागातील लिंग

**गुणोत्तराचा अभ्यास करणे.**

**अभ्यास क्षेत्र :**

**दौंड तालुका हा पुणे जिल्हातील पूर्वेकडील तालुका आहे. दौंड तालुक्याचा भौगोलिक विस्तार १७°५१' उत्तर ते १८°८० उत्तर अक्षांश आणि ७०°५१' पूर्व ते ७३°४०'पूर्व रेखांश इतका असून एकूण क्षेत्रफळ १२८८.०४ चौ. कि. मी इतके आहे. ह्यातालुक्याच्या उत्तरेला आणिपूर्वेला भीमा नदी आहे. दौंड तालुक्याच्या दक्षिणेकडील सीमेलगत पुरंदर, बारामती आणि इंदापूर हे तालुके आहेत. पश्चिमेकडील सीमेलगत हवेली आणि शिरूर हे तालुके आहेत.**

**नकाशा १ : पुणे जिल्हा अभ्यास क्षेत्राचा नकाशा**




(Source-District Planning Series)

**दौंड तालुक्यात एकूण १०२ गावे व २ नागरी केंद्रे आहेत. तर त्यामध्ये राहू. यवत, केडगाव मंडल, दौंड, रावणगाव या ५ मंडलाचा समावेश करण्यात आला आहे. दौंड तालुका हा दख्खन पठाराचा भाग असून हे**

उत्तरेस भीमा खोरे आहे. दौंड तालुक्यातील भीमा ही प्रमुख नदी असून मुळा–मुठा या तिच्या उपनद्या आहेत. दौंड तालुक्यातील हवामान हे अर्ध शुष्क प्रकारचे आहे. अनियमित व अपुऱ्या पडणाऱ्या पावसामुळे या ठिकाणी विखुरलेल्या वनस्पती आढळतात.

**माहितीस्त्रोत आणि अभ्यास पध्दती :**

दौंड तालुक्यातील लिंग गुणोत्तराचे विश्लेषणात्मक विवेचन करण्यासाठी प्रामुख्याने द्वितीय साख्यिकीचा वापरकेला आहे. दौंड तालुक्यातील १९९१, २००१ व २०११ मधील गावनिहाय लोकसंख्या सांख्यिकी पुणे जिल्हा जनगणना मधून घेतली आहे. त्याचबरोबर सन २०१४ व २०१५ च्या आर्थिक व सामाजिक समालोचन पुणे जिल्हा या मधून उपलब्ध आकडेवारी संकलित केली असून या सांख्यिकीचे विश्लेषण करण्यासाठी सांख्यिकीय,संगणकीय आणि नकाशाशास्त्रीय पध्दतीचा वापर केला आहे. या तालुक्यातील मंडलनिहाय लिंग गुणोत्तराचे विश्लेषण केले आहे. Arc GIS AreGIS या संहितेच्या सहाय्याने संबंधित हेतू नकाशे तयार केले आहेत.

**संदर्भ साहित्याचाआढावा :**

डिसोझा आणि चेन (१९८०) , पार्क आणि चो (१९९५) यांनी बांग्लादेशआणि आशियाई देशांमधील मर्त्यतेतील फरक आणि लिंग गुणोत्तर कमी होण्यास मुलगा वंशाचा दिवा, लिंग निदान, स्त्री लिंग असल्यामुळे होणारा गर्भपात या कारणांमुळे लिंग गुणोततर कमी होत आहे. चक्रवर्ती आणि सिन्हा (२००८) यांनी भारतातील १९७१ ते २००१ या काळातील घटत्या लिंग गुणोत्तरावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करून बाल लिंग गुणोत्तर आणि सामाजिक,आर्थिक घटक यांच्यातील सहसंबंध व्यस्त असल्याचा निष्कर्ष काढला आहे.

नरके, आहेर, ठोंबरे (२००८) यांनी अहमदनगर जिल्हयातील स्त्री–पुरूष प्रमाणाचा अभ्यास केला आहे. कानकुरे(२०११) यांच्या परभणी जिल्हयातील तालुकनिहाय लोकसंख्येच्या वैशिष्टयांचा व लिंग गुणोत्तर अभ्यासावरून सन १९९१ ते २००१ कालावधीतील परभणी जिल्हयातील लिंग गुणोत्तर समाधानकारक नसल्याचे दिसून येते. बरकडे (२०१२) यांनी सन १९९१ ते २०११ या कालावधीतील महाराष्ट्रामध्ये आढळणारी लोकसंख्येची वैशिष्ट्य, लोकसंख्या वाढ, लिंग गुणोत्तर यांचे स्पष्टीकरण केले आहे. हरवाळकर आणि खान (२०१२) यांनी सोलापूरजिल्यातील लोकसंख्येच्या वैशिष्टयांचा अभ्यास केला आहे. सोनवणे (२०१३) यांनी महाराष्ट्रातील शहरी आणि ग्रामीण लिंगगुणोत्तर जिल्हानिहाय, वयोमानानुसार लिंगगुणोत्तर तपासण्याच्या प्रयत्न केला गेला आहे. भावसर (२०१४) यांनी धुळे जिल्हयातील आदिवासी जमातीतील बदलते लोकसंख्या रचनेचे वार्षिक विश्लेषण करून लिंग गुणोत्तराचे आकृतीबंध सांगितले आहेत. त्याचबरोबर आदिवासी जमातीतील लिंग गुणोत्तरांवर परिणाम करणाऱ्या घटकांचे वर्णन करून आदिवासी जमातीमध्ये लिंग गुणोत्तरात वाढ झालेली आढळते. पाटील आणि माने (२०१५) यांनी भूधारगड तालुक्यातील १९९१ ते २०११ मधील साक्षरता व लिंगगुणोत्तर यांचा तुलनात्मक अभ्यास केला आहे.

**दौंड तालुक्यातील लिंग-गुणोत्तर :**

दर हजार पुरूषांमागे स्त्रियाचे असणारे प्रमाण म्हणजे लिंग गुणोत्तर होय. लिंग गुणोत्तरावरून तो प्रदेश विकसित आहे कि अविकसित हे समजते. दर हजारी पुरूषामागे स्त्रियांचे प्रमाण हे योग्य प्रमाणात असेलतर तो प्रदेश आर्थिक, औद्योगिक, आणि सांस्कृतिकदृष्ट्या प्रगत समजला जातो. सन १९९१, २००१ आणि २०११ मध्ये दौंड तालुक्याचे एकुण लिंगगुणोत्तर (९३७) पुण जिल्हयाच्या (९३३)तुलनेतजास्त होते. सन १९९१ मध्ये दौंड मंडल वगळता सर्वच मंडलामध्ये सरासरीपेक्षा जास्त लिंगगुणोत्तर असल्याचे दिसून येते. परंतु सन १९९१ पासून २०११ पर्यंत सर्वच मंडलांचे लिंगगुणोत्तर सातत्याने कमी होत असल्याचे निदर्शनास येते. सन १९९१,२००१ आणि २०११ मध्ये अनुक्रमे राहू व केडगाव मंडलमध्ये सर्वाधिक लिंग गुणोत्तर (९७५ व ९६३,९५६) तर दौंड, रावणगाव व यवत मंडलमध्ये सर्वात कमी लिंग गुणोत्तर (८९१,८९१ व ९१८)होते. अशाप्रकारे अभ्यासक्षेत्रात सातत्याने लिंग गुणोत्तर घटल्याचे निदर्शनास येते.

**कोष्टक १ : दौंड तालुक्यातील लिंग गुणोत्तर व बाल लिंगगुणोत्तर**


| अ.क्र. | वर्ष/मंडल | लिंगगुणोत्तर | | | बाल लिंगगुणोत्तर | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९१ | २००१ | २०११ | १९९१ | २००१ | २०११ |
| १ | राहू | ९७५ | ९३८ | ९२५ | १०३३ | ८६९ | ८५२ |
| २ | यवत | ९३९ | ९२८ | ९१८ | ९३६ | ८९३ | ८५० |
| ३ | केडगाव | ९६५ | ९६३ | ९५६ | ९७७ | ८९९ | ८४३ |
| ४ | दौंड | ८९१ | ९१४ | ९४६ | ९३४ | ८७८ | ८७७ |
| ५ | रावणगाव | ९४० | ८९१ | ९३० | ८९५ | ९०८ | ८५२ |
| ६ | दौंड तालुका | ९३७ | ९२२ | ९३० | ९५२ | ८९३ | ८५६ |
| ७ | पुणे जिल्हा | ९३३ | ९१९ | ९१५ | ९४२ | ९०२ | ८८३ |

(स्त्रोत- पुणे जिल्हा जनगणना अहवाल १९९१,२००१,२०११)

**बाल लिंगगुणोत्तर :**

बाल लिंगगुणोत्तर म्हणजे ०६ वर्षे वयोगटातील मुलींच्या संख्येचे मुलांच्या संख्येशी असलेले गुणोत्तर होय हे गुणोत्तर दरहजारी व्यक्त केले जाते. या लिंग गुणोत्तरातून प्रत्यक्ष जन्मदर, कुटुंबाचा आकार, भविष्यकालीन लोकसंख्या वाढ या संदर्भात अंदाज व्यक्त करता येतो. सन १९९१ मध्ये पुणे

नकाशा ३ : दौंड तालुक्यातील बाल लिंगगुणोत्तर




जिल्हयाच्या तुलनेत दौंड तालुक्यात फक्त ० ते ६ वर्षे वयोगटातील लिंगगुणोत्तर प्रमाण जास्त आढळले . सन १९९१ मध्ये सर्वात जास्त बाल लिंगगुणोत्तर राहू (१०३३) या मंडलमध्ये तर सर्वात कमी बाल लिंगगुणोत्तर रावणगाव (८९५) या मंडलमध्ये आढळले. सन १९९१, २००१ व २०११ मध्ये सर्वात जास्त बाल लिंगगुणोत्तर अनुक्रमे राहू, रावणगाव आणि दौंड मंडलमध्ये तर सर्वात कमी बाल लिंगगुणोत्तर रावणगाव राहू व केडगाव या मंडलात (८९५,८६९ व ८४३) दिसून येते.

राष्ट्रीय व राज्य महामार्ग ०एन.एच ९ – पुणे सोलापूर), मीटर गेज आणि ब्रॉड गेज रेल्वे मार्ग यामुळे वाहतूकीची सुगमता कुरकुंभ एम, आय डी. सी. मुळे रोजगाराची उपलब्धता, शैक्षणिक व आरोग्यसुविधांची उपलब्धता परिणामी छोटे कुटुंबास दिले प्राधान्य यामुळे बाल लिंगगुणोत्तरात घट झालेली दिसून येते.

**अनुसूचित जातींचे लिंग-गुणोत्तर:**

'आर्थिक दृष्टया, सामाजिकदृष्टया, मागासलेली जमात म्हणजे अनुसूचित जमात होय' लिंगगुणोत्तरात अनुसूचित जमातीची लोकंसख्या व त्यांचे लिगगुणोत्तर महत्वाची भूमिका बजावतात. म्हणूनच या लिंगगुणोत्ताराचाही समावेश यामध्ये केला आहे. सन १९९१ व २०११ मध्ये पुणे जिल्हयाचे अनुसूचित जामतींमधील लिंगगुणोत्तर दौंड तालुक्याच्या तुलनेत जास्त दिसून येते. सन १९९१ ते २००१ मध्ये केडगाव,

दौंड, रावणगाव येथे अनुसूचित जमातीमधील ही वाढ धनात्मक तर अन्य मंडलमध्ये ती ऋणात्मक दिसून येते.

सन २००१ व २०११ या दशकामध्ये राहू मंडल, यवत मंडल आणिदौंड मंडलमध्ये ही वाढ धनात्मक दिसून येते. तर केडगाव मंडल व रावणगाव मंडलमध्ये ही वाढ ऋणात्क दिसून येते.

**नागरी लिंगगुणोत्तर :**

ग्रामीण भागातील शेतीवर आधारित अर्थव्यवस्था,सामाजिक रूढी परंपरांचा प्रभाव, साक्षरतेचा कमी दर, तसेच नागरी भागात नागरीकरण, साक्षरतेचा, जास्त दर, अनेक सेवा-सुविधांची उपलब्धता यामुळे लिंगगुणोत्तरात विविधता आढळते, अभ्यास क्षेत्रातील फक्त दौंड मंडलमध्येच नागरी लोकसंख्या असून येथील नागरी लोकसंख्येतील लिंगगुणोत्तरात सातत्याने धनात्मक बदल होत असल्याचे दिसून येते.

**कोष्टक : ३ दौंड तालुक्यातील ग्रामीण व नागरी लिंगगुणोत्तर**

| लिंगगुणोत्तर | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९१ | | २००१ | | २०११ | |
| अ.क्र. | वर्ष/मंडल | ग्रामीण | नागरी | ग्रामीण | नागरी | ग्रामीण | नागरी |
| १ | राहू | ९७५ | - | ९३८ | - | ९२५ | - |
| २ | यवत | ९३९ | - | ९२८ | - | ९१८ | - |
| ३ | केडगाव | ९६५ | - | ९६३ | - | ९५६ | - |
| ४ | दौंड | ८६४ | ८८१ | ८८९ | ९५४ | ९२७ | ९७१ |
| ५ | रावणगाव | ९४१ | - | ८९१ | - | ९३१ | - |

(स्त्रोत-जनगणना अहवाल १९९१,२००१,२०११)

**निरीक्षणे :**

* सन १९९१ ते २०११ या कालावधीत फक्त दौंड मंडलमधील लिंग-गुणोत्तरात धनात्मक वाढ झालेली दिसून येते. सन १९९१ ते २००१ या दशकात दौंड वगळता सर्वच मंडलमध्ये लिंग-गुणोत्तरात घट झाली आहे. सन २००१ ते २०११ या दशकात दौंड व रावणगाव मंडलमधील लिंग-गुणोत्तरात वाढ झालेली दिसून येते.

* सन १९९१ मध्ये बाल लिंग-गुणोत्तर राहू मंडलमध्ये सर्वात जास्त (१०३३) तर रावणगाव मंडलमध्ये सर्वात कमी (८९५) आढळले. पहिल्या दशकातरावणगाव मंडलमधील यालिंग गुणोत्तरात वाढ झाली असून उर्वरित सर्वच मंडलांचे हे लिंग-गुणोत्तर घटलेले दिसून येते.

*सन २००१ मध्ये बाल लिंग-गुणोत्तर रावणगाव मंडलमध्ये जास्त असून ते ९०८ इतके आढळले. तर राहू मंडलमध्ये ८६९ इतके आढळले.तर केडगाव मंडलमध्ये ८४२ इतके कमी आढळले.

* सन १९९१ मध्ये अनुसूचित जातींमधील लिंग-गुणोत्तर राहू मंडलमध्ये जास्त असून ते ९७१ इतके आढळले. तर दौंड मंडलमध्ये ९३७ इतके कमी आढळले. तर दौंड मंडलमध्ये ९०० इतके कमी आढळते. २०११ मध्ये अनुसूचित जातीमधील लिंग-गुणोत्तर दौंड मंडलमध्ये जास्त असून ते ९८९

इतके आढळले. तर रावणगाव मंडलमध्ये ५११ इतके कमी आढळले.

*सन १९९१ व २००१ मध्ये अनुसूचित जमातींमधील लिंग गुणोत्तर केडगाव यामंडलमध्ये जास्त असून ते ९३६ व १०२९ होते. याच काळात रहा्‌ मंडल व दौंड मंडलमध्ये जास्त (९७९) इतके रावणगाव मंडलमध्ये ते कमी (५६५) होते.

**संदर्भ :**


*Barakade A. J. (2012) "Declining Sex Ratio An analysis with special Reference to Maharashtra 'Geosciences Reasearch, Vol.3 No. 1 pp. 92-95.

*Bhavasar S. S. &Thakare, P.S. et al. (2014) "changing Tribal Sex Ratio in Dhule District" , Maharashtra Bhugolshastraparishad, pp१३५

*Chakraborty, L. S. and Sinha D.(2008) "Determinats of Declinning Child Sex Ratio in India. An Empirical Investigation Online at http://mpra.ub.uni-MUENCLTEN.DE17602.

*D' souza, S and Lincbln c. chen (1980) "Sex Differences in Mortility in Rural Bangladesh" , Population and Development Review vol. 27, No. 1 pp 33-63.

*District Census Handbook (1991): pune District, Government of Maharashtra.

*Kankure, 'K. B. (2011), "A study of Sex Ratio In Parbhani District (M.S.)" ,shodhsamikshaAurmulyankan, International Referred Reasearch Journal , Aug 2011, ISSN-0974-2832, RNI-RAJBIL 2009/ 29954 vol.3 Issue 31,pp 1-2.

* नरके एस.वाय., आहेर ए.बी., ठोंबरे पी.वाय. (२००८) 'अहमदनगर जिल्हयातील लिंग रचना भौगोलिक विश्लेषण 'महाराष्ट्र भूगोलशास्त्र संशोधन पत्रिका,खंड २३, अंक१, पृष्ठ क्र. ८-१४.

*पाटील आणि माने (२०१२) 'भूधरगड तालुक्यातील साक्षरता व लिंगगुणोत्तर यांचा तुलनात्मक अभ्यास, 'महाराष्ट्र भूगोलशास्त्र संशोधन पत्रिका, पृष्ठ क्र. ४७-५१.

*सोनवणे विष्णू (२०१३), व्ही. नवणे, एस. सो. 'महाराष्टातील लिंग गुणोत्तराचा भौगोलिक अभ्यास', भूगोल महाराष्ट्र भूगोलशास्त्र संशोधन पत्रिका, अंक क्र.८ पृष्ठ क्र. ६३-६७.

* हारवाळकर आणि खान (२०१२),'सोलापूर जिल्हयातील लोकसंख्येच्या वैशिष्टयांचा अभ्यास', महाराष्ट्र भूगोलशास्त्र संशोधन पत्रिका, अंक पृष्ठ क्र. २९-३५.



***Dr. Ratnaprabha Jadhav**
S. N. D. T. Women's University,
Pune Campus

****Ms. Apurva Rahate**
S. N. D. T. Women's
University, Pune Campus.